# पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर रोपवाटिका योजना

धनश्री दत्तात्रय निगडे
आचार्य पदवी विद्यार्थिनी, विस्तार शिक्षण विभाग,
वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी

कृषी विभागामार्फत चालवले जाणाऱ्या "विकेल ते पिकेल" या अभियानाचा शुभारंभ झाला त्याचवेळी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर रोपवाटिका योजनेचाही शुभारंभ केला गेला. पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर रोपवाटिका योजना शेतकऱ्यांसाठी लाभदायक ठरणार आहे. महाराष्ट्र राज्य हे फलोत्पादनामध्ये अग्रेसर आहे. तसेच मोठ्या प्रमाणात भाजीपाला पिकाची व्यावसायिक पद्धतीने लागवड करून उत्पादन घेतले जाते. त्याची निर्यातही मोठ्या प्रमाणात करण्यात येते. मागील दोन-तीन वर्षापासून भाजीपाला पिकाचे निर्यातक्षम व विषमुक्त उत्पादन करण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे. त्यामुळे भाजीपाला अभियानाच्या चांगल्या जाती व चांगली रोपे याची मागणी वाढत आहे. त्यादृष्टीने नियंत्रित वातावरणामध्ये तयार झालेली कीड व रोगमुक्त भाजीपाला रोपांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत आहे.

योजनेचे उद्देश:
- भाजीपाला पिकांची दर्जेदार व किडरोग मुक्त रोपे निर्मिती करून उत्पन्न व उत्पादनात वाढ करणे.
- रोपवाटीकेमुळे स्थानिक शेतकऱ्यांना शेतीपूरक व्यवसायाची संधी उपलब्ध करून देणे.
- पिक रचनेत बदल घडवून आणणे व नवीन तंत्रज्ञानाचा वापर करणे.
- शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न व भाजीपाला उत्पादनात वाढ करणे.
- सदर योजनेचा कालावधी दोन वर्षांचा राहील.

रोपवाटीकेत खालील रोपे तयार करता येतील:
- भाजीपाला पिके: टोमॅटो, वांगी, हिरवी मिरची, कोबी, फुलकोबी, शिमला मिरची, कांदा व इतर पिके.
- फळपिके: पपई, शेवगा इत्यादी.

पहिल्या टप्प्यात ५०० लाभधारकांची प्रायोगिक तत्त्वावर निवड:
- पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर रोपवाटिका योजनेच्या पहिल्या टप्प्यात ५०० लाभधारकांची प्रायोगिक तत्त्वावर निवड करण्यात येणार आहे.
- लाभार्थी प्रामुख्याने कृषी पदवी किंवा पदविकाधारक महिला असतील. महिला बचत गटास प्राधान्य देण्यात येईल. त्याचप्रमाणे भाजीपाला उत्पादक शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या यांना देखील प्राधान्य देण्यात येणार आहे.

भाजीपाला पिकाची दर्जेदार व कीडरोग मुक्त रोपे निर्मिती:
- ५०० लाभधारकांसाठी ५०० एकर भाजीपाला रोपवाटिका तयार करण्यात येणार आहे.
- या योजनेमुळे भाजीपाला पिकाची दर्जेदार व कीडरोग मुक्त रोपे निर्मिती उत्पादनात वाढ होणार आहे. तसेच स्थानिक शेतकऱ्यांना शेतीपूरक व्यवसायाची संधी उपलब्ध होणार आहे.
- पिक रचनेत देखील बदल होणार आहे. शेतकऱ्यांना प्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहे.

ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत:
- या अभियानाची सुरुवात करताना सर्वप्रथम ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. प्रत्येक तालुक्याला लक्ष्यांक देण्यात येईल. लक्ष्यांकापेक्षा जास्त अर्ज आल्यास तालुकास्तरावर सोडत पद्धतीने यादी तयार केली जाईल.
- तालुकास्तरावरुन पूर्व संमती देण्यात येईल आणि कामाची सुरुवात करण्यात येईल. प्रथमत: ६० टक्के अनुदान देण्यात येईल व रोपांची विक्री सुरु झाल्यानंतर दुसरा हप्ता ४० % शेतकऱ्याच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा केला जाईल.

योजनेंतर्गत तांत्रिक प्रशिक्षण:
- भाजीपाला रोपवाटीकांचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांना तीन ते पाच दिवसाचे तांत्रिक प्रशिक्षण हॉर्टीकल्चर ट्रेनिंग सेंटर, तळेगाव दाभाडे किंवा कृषी विज्ञान केंद्र, बारामती येथे अनिवार्य राहील.

लाभार्थी पात्रता निकष:
- अर्जदाराकडे स्वत:च्या मालकीची किमान ०.४० हे. (१ एकर) जमिन असणे आवश्यक आहे.
- रोपवाटिका उभारण्यासाठी पाण्याची कायमची सोय असणे आवश्यक आहे.
- महिला कृषी पदवी धारकांना प्रथम प्राधान्य राहील.
- महिला गटास द्वितीय प्राधान्य.
- भाजीपाला उत्पादक अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व शेतकरी गट यांना प्राधान्य.
- अनुसूचित जाती व जमाती यांना केंद्र सरकारच्या मापदंडाप्रमाणे लाभ देण्यात येईल.

(संपर्क: +९१ ९९७५२९५८००)

★ ★ ★